२४e१४

# महाराष्ट्र शासन

## संचालनालय, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य,

## कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई ४०० ६१४

☏ 🖷 -०२२-२७५७१३९१ E.Mail:- caifak6@yahoo. com

**कार्यालयीन आदेश क्र. ८ दिनांक - 2 FEB 2011**

विषय :- जिल्हा परिषद/नगरपरिषद/ग्रामपंचायतीचे वार्षिक लेखे प्रमाणित करणेबाबत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद/पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ६५ अन्वये जिल्हा परिषदेचे वार्षिक लेखे वित्तीय वर्ष संपल्यानंतर ३० जून रोजी जिल्हा परिषद स्तरावर बंद केले जातात. त्यानंतर संबंधित उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांचेकडे तपासणी व प्रमाणित करण्याकरिता सादर केले जातात. उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांनी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेला वार्षिक लेखा तपासणी करून निदर्शनास आणलेल्या त्रुटी संबंधित जिल्हा परिषदेकडे पुन्हा त्रुटीपूर्ततेसाठी पाठविले जातात. जिल्हा परिषदेने त्रुटींची पूर्तता करून पुन्हा उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा कार्यालयात सादर केल्यानंतर वार्षिक लेखा प्रमाणित करणेकरिता सहमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा कार्यालयात सादर केल्यानंतर मुंबई स्थानिक निधी लेखा नियम १९३१ चा नियम २७ (ग) व (ह) मध्ये नमूद केल्यानुसार प्रमाणित करणे आवश्यक आहे. तथापि जिल्हा परिषदेकडून त्रुटींची पुर्तता परिपूर्ण होत नसल्याने त्याप्रमाणे प्रमाणपत्र दिले जात नाही. त्यामुळे त्रुटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून प्रमाणपत्र दिले जाते.

ज्याप्रमाणे जिल्हा परिषदेचे वार्षिक लेखे तपासले जातात त्याचप्रमाणे नगरपरिषद/ग्रामपंचायत इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थांचे देखिल वार्षिक लेखे तपासणे / प्रमाणित करणे आवश्यक असताना बऱ्याच प्रकरणी स्थानिक निधी लेखा विभागाकडून वार्षिक लेखे तपासले जात नाहीत व प्रमाणित करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

अ) जिल्हा परिषदेचे वार्षिक लेखे प्रमाणित करताना मुंबई स्थानिक निधी लेखा नियम १९३१ चा नियम २७ (ग) व (ह) मध्ये नमूद केल्यानुसार प्रमाणित करण्यात यावे.

ब) नगरपालिकचे वार्षिक लेखे प्रमाणित करताना महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चा नियम क्र.१०२ (२) नुसार प्रमाणित करण्यात यावे.

क) ग्रामपंचायतीचे वार्षिक लेखे प्रमाणित करतांना महाराष्ट्र ग्रामपंचायत ( हिशेब तपासणी ) नियम १९६१ चा नियम १८ (ग) नुसार प्रमाणित करण्यात यावे.

(के.एम.विधाते)
मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा, संचालनालय,
महाराष्ट्र राज्य.

प्रत:- १) सहमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२) उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा सर्व.
३) अहवाल शाखा (ओएसडी, अेअे-१, अेअे-२, अेअे-३)
४) अभिलेखापाल.

Pravin com./acer/ahawal/asa/letter/१०/१/११